सत्र खटला क्र.३५/२०२०

सरकार -वि- अक्षय ब्राम्हणे

निशाणी क्रमांक -३१

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०१ याची जबानी**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की

**माझे नांव - प्रशांत मधुकर सरदार.**

**वय - ५१ वर्ष, व्यवसाय – नोकरी ( एस.टी. चालक )**

**राहणार - चिखली जि. बुलढाणा.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**अभियोग पक्षातर्फे सरतपास विधिज्ञ श्री. एस. एच. जोशी**

०१. घटना दि.०७/०२/२०२० रोजी सकाळी ७.१५ वाजता दहीवडीच्या अलिकडे घडली. त्यादिवशी माझी नांदुरा ते दहिवडी या एस.टी. बस वर चालक म्हणून ड्युटी होती. माझ्यासोबत नरहरी जायभाय हा वाहक होता. मी दहिवडी कडे जात असतांना न्यायालयासमोरील आरोपी हे रस्त्यावर व्यायाम करत होते. त्यावेळी माझी बस त्यांच्या बाजूने गेली. मी बस घेवून परत येत असतांना त्यांनी माझी बस अडवली व आरोपी क्र.१ हा एस.टी. बसमध्ये आला व त्याने मला बस जोरात का नेली असे म्हटले. त्याने माझी कॉलर पकडली व आमच्यामध्ये झटापट झाली. त्यामध्ये माझ्या पायाला व डोक्याला मार लागला. त्यानंतर आरोपी क्र.२ व ३ हे बसमध्ये आले व आरोपी क्र.१ ला बसच्या बाहेर घेवून गेले. त्यावेळी आरोपी क्र.१ मला म्हणाला की, तु गाडी परत आणू नको नसता तुला जिवे मारीन. त्यानंतर मी पोलिस ठाणे नांदुरा येथे गेलो व घटनेची फिर्याद दाखल केली. फिर्याद मला दाखवली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. ती **निशाणी क्र.३२** वर आहे. सदर फिर्यादीवरून पोलिसांनी घटनेचा प्राथमिक अहवाल नोंदविला. सदर अहवाल मला दाखविला. त्यावर माझी सही आहे. तो **निशाणी क्र.३३** वर आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. मी पोलिसांना तपासादरम्यान घटनास्थळ दाखविले होते. पोलिसांनी मला सरकारी दवाखाना नांदुरा येथे वैद्यकीय

तपासणीसाठी पाठविले होते. पोलिसांनी माझे बयान नोंदविले होते. अरोपी न्यायालयासमक्ष हजर आहे. ते तेच आहे.

सरतपास पुर्ण.

**आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री. आय. एफ. जैन.**

०२. मला घटनेच्या वेळी मी नेत असलेल्या एस.टी. बसचा क्रमांक आठवत नाही. मी खामगांव डेपोमध्ये चालक म्हणून काम करण्यापूर्वी सांगली जिल्ह्यात जत डेपोत कार्यरत होतो. मला खामगांव डेपो मध्ये रूजू करून घेतल्याचे प्रमाणपत्र माझ्याकडे नाही. तसेच राज्य परीवहन बुलढाणा येथे रुजू करून घेतल्याचे प्रमाणपत्र माझ्याकडे नाही. दि.०७/०२/२०२० रोजी मी नांदुरा येथे मुक्कामी होतो. त्यासंदर्भात माझ्याकडे डेपो व्यवस्थापकाचे पत्र नाही. दि.०७/०२/२०२० रोजी मी दिवसभर नांदुरा येथे होतो. त्यादरम्यान मला खामगांवला जाण्याचे काम पडले नाही. नांदुरा ते दहिवडी हे अंतर अंदाजे १० किलोमीटर आहे. नांदु-याहुन दहिवडी येथे बस जात असतांना तिच्या वेळेची व बसची नोंद नांदुरा डेपो मध्ये घेतल्या जाते. त्यासंदर्भातील पत्र माझ्याकडे नाही. नांदुरा ते दहिवडी जाण्याचा माझा सकाळी ७ वाजेचा टाईम होता. सदर रूट चा क्रमांक मला माहित नाही. माझा ड्युटी क्रमांक ७० - ७१ असा होता. नांदुरा दहिवडी हे ७१ क्रमांकामध्ये येते. नांदु-याहुन दहिवडी येथे जात असतांना बसमध्ये कोणीही प्रवासी नव्हते. दहिवडी येथून परत येतांना बसमध्ये शाळेची मुले होती. दहिवडी येथून बस ७.१५ वाजता निघाली. सदर मुले ही पहिली ते चौथी वर्गातील होती.

०३. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी माझी नांदुरा ते दहिवडी या बसवर सकाळी ७ वाजता ड्युटी नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझी दहिवडी ते नांदुरा या परतीच्या प्रवासात देखील ड्युटी नव्हती. नांदुरा येथे नियंत्रक म्हणून त्यावेळी श्री. गायकी हे कार्यरत होते. मी दहिवडी येथे ब-याच वेळेस बस घेवून जात होतो. हे

म्हणणे खरे नाही की, दहिवडी ग्रामपंचायत मधील पदाधिका-यांनी मी ड्युटी व्यवस्थीत करत नाही म्हणून माझी तक्रार केली होती. नांदुरा दहिवडी रस्त्यावर रहदारी असते. तसेच सदर रस्त्यावरील शेतांमध्ये आजुबाजूला बरीच घरे आहेत व बरेच लोक शेतात राहतात. असे काही घडले नाही की, मी दि.०६/०२/२०२० रोजी दहिवडी येथे बस घेवून गेलो व त्याच दिवशी परत आलो व नंतर गेलो नाही. माझी बस अडविल्यानंतर मी पोलिस ठाण्यामध्ये मोबाईल वरून कळविले नाही. माझी बस अडविली त्यावेळी तेथे १० ते १२ मुलं होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आजुबाजूच्या शेतांमध्ये १० ते १२ लोक होते. आरोपींनी बसचे काही नुकसान केले नही. पोलिसांनी बसचा पंचनामा केला नाही. आरोपी क्र.१ हा वाहकाच्या दरवाज्यामधून आत आला. सदर दरवाज्याजवळ वाहक बसलेला असतो. वाहकाने आरोपी क्र.१ ला अडविले होते परंतू त्याने त्याला धमकी दिली. सदर दरवाजा आतून पट्टी टाकून बंद केलेला नव्हता. नांदु-याहून बस निघाली त्यावेळी तेथील नियंत्रकाकडे तिची नोंद केली होती. आरोपींची पोलिस ठाण्यामध्ये माझ्या समक्ष ओळख परेड घेण्यात आली नाही. असे काही घडले नाही की, मी बस मधील प्रवाश्यांना आरोपींची नावे विचारली व त्यांच्याकडून आरोपींची नावे माहिती करून घेतली. माझ्या फिर्यादीतील अधोरेखांकित भाग-अ मला वाचून दाखविला तो चुकीचा लिहीलेला आहे. फिर्यादी नंतर माझा जबाब कधी नोंदविण्यात आला हे मला आठवत नाही.

०४. दि.०६/०२/२०२० रोजी माझ्या बसच्या जिगांव ते नांदुरा या फे-या होत्या. माझी कॉलर ओढल्यावर शर्टचे बटन तुटले नव्हते. घटनेच्या वेळी वाहक मला सोडविण्यास आला नाही. घटनेनंतर मी बस मधील प्रवासी मुलांना नांदुरा बसस्थानकावर सोडून त्यानंतर मी पोलिस ठाण्यात गेलो. मी पोलिस ठाणे नांदुरा येथे ८ ते ८.३० वाजता पोहोचलो. असे काही घडले नाही मी दि.०६/०२/२०२० रोजी पोलिस ठाण्यामध्ये गेलो होते. दि.०७/०२/२०२० रोजी माझी नांदुरा ते दहिवडी ही फेरी

असल्याचे लॉगशीट माझ्याकडे आहे. सदर लॉगशीटची प्रत मी पोलिसांना दिली होती. मी अरोपी विरूध्द माझ्या वरीष्ठांकडे तक्रार केली नव्हती. बस मधील प्रवासी मुले ही १० वर्षाच्या आतील होती. माझी बस नांदुरा ते दहिवडी व दहिवडी ते नांदुरा ही योग्य वेळेवर जावून आली. मला घटनास्थळाच्या चतुर्सिमा सांगता येणार नाही. बस रस्त्याच्या डाव्याबाजूने जात होती. घटनास्थळ पंचनामा दि.०८/०२/२०२० रोजी करण्यात आला त्याकरीता मी नांदुरा येथून घटनास्थळावर गेलो होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने मला मारहाण केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने मला बस थांबवून अडवले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे बसमध्ये चढल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.०७/०२/२०२० रोजी सकाळी ७ वाजता माझी नांदुरा दहिवडी बसवर ड्युटी नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी ग्रामपंचायत पदाधिका-यांनी माझ्याविरूध्द तक्रार केल्यामुळे मी अरोपींविरूध्द खोटी फिर्याद दाखल केली. घटनेपुर्वी मला आरोपींची नावे माहिती नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दहिवडी हे जिगांव रस्त्यावर नाही. नांदुरा दहिवडी च्या मध्ये जिगांव लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने मला जिवे मारण्याची धमकी दिली हे मी खोटे सांगत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,
Digitally signed by
RAJENDRAKUMAR
BABASAHEB GIRI
Date: 2026.02.25
13:58:27 +0545

**(आर. बी. गिरी)**

अतिरिक्त सत्र न्यायाधीश मलकापूर

मलकापूर.
दिनांक - २५/०२/२०२६.

- - - - -

## CERTIFICATE

I certify that this order P.D.F. uploaded is a true and correct copy of original signed order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | : | Adhoc District Judge – 1 & Additional Sessions Judge, Malkapur. |
| Name of Stenographer | : | Shri. V. S. Jadhav. (Junior Clerk) |
| Date of order | : | 25.02.2026 |
| Date of signed on order by Judicial Officer | : | 25.02.2026 |
| Date of uploading | : | 25.02.2026 |